# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/२०१२/११२०

दिनांक : 13 NOV 2012

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे

विषयः- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमात अंतिम दिनांकापुर्वी झालेल्या विद्यार्थी प्रवेशाची माहिती विहित मुदतीत संकेतस्थळावर <u>अपलोड न केल्याबाबत</u>...

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता आपले अधिनस्त काही संस्थांची उपरोक्त विषया संदर्भात विनंती आपले शिफारशींसह या संचालनालयास प्राप्त होत आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, खाली नमुद बाबीची पुर्तता झाल्याची खात्री करुन संबंधित विद्यार्थीची गुणवत्ता यादी तपासुन प्रकाशित करावी.

१. उपरोक्त विषयाबाबत प्राप्त सर्व प्रवेश अंतिम दिनांकापुर्वी झाले आहेत यांची संबंधित सहसंचालक यांनी शहानिशा करुन व्यक्तीशः खात्री करावयाची आहे.
२. प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावरील प्रस्तावित दंडात्मक कार्यवाहीनुसार शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी दंडाची रक्कम भरावी लागल्यास सदर दंड भरण्यास तयार असल्याचे हमी बाबतचे शपथपत्र संबंधित संस्थेकडुन (प्राचार्य व अध्यक्ष/सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीसह) रु. १००/- नॉन-ज्युडिशियल पेपरवर नोंदणीकृत करुन घेण्यात यावे.
३. वरील बाब शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिताच मर्यादित असल्याने अशा सर्व संबंधित संस्थेकडुन अशा प्रकारची पुर्नरावृत्ती भविष्यात होणार नाही, असे आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.

---

<u>महत्वाचे</u>

क.तंशिस / प्राकाना / शैवि / पदविका प्रवेश / 2012 / 3325

दि. 19 NOV 2012

प्रति,

प्राचार्य,

सर्व विनाअनुदानित पदविका संस्था.

उपरोक्त विषयासंदर्भात सर्व विनाअनुदानित पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, ज्या संस्थांनी त्यांचे प्रथम / द्वितिय वर्ष पदविका प्रवेश विहीत मुदतीत अपलोड केलेले नाहीत त्यांनी वर दिलेल्या सुचनांचे पालन करावे. यापुढे अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही यांची सर्व संस्थांनी दक्षता घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.